# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,

**कृषि नगर, वसमत रोड,**

**परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)**

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com / reg@mkv.ac.in | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : www.vnmkv.ac.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५,२२३५८२ |


**जा.क्र.२०२१/सेप्रप-३६ वी/आस्था-३/4030**

**दिनांक २१/१०/२०२१**

वाचाः विद्यापीठ परिपत्रक जा.क्र./सेप्रप-३६ वी/आस्था-३ दिनांक १८/०१/२०२१

## परिपत्रक

संदर्भिय विद्यापीठ परिपत्रकान्वये, ३६ व्या विद्यापीठ सेवा प्रवेशोत्तर परिक्षेचे आयोजन विद्यापीठ स्तरावर करण्याचे नियाजीत असून सदर परिक्षेस बसण्यास इच्छुक असलेल्या विद्यापीठ अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून दिनांक १५/०२/२०२१ पर्यंत कार्यालय प्रमुख यांच्यामार्फत अर्ज मागविण्यात आले होते. तथापि कोव्हिड-१९ विषाणुच्या दुसऱ्या लाटेच्या प्रार्दुभावामुळे सदरील परीक्षा नियोजीत वेळेत घेणे शक्य झाले नाही.

यादरम्यानच्या कालावधीत काही संवर्गामध्ये नविन नियुक्त्या झालेल्या असल्याने, यामधील जे अधिकारी/कर्मचारी सदर परिक्षेस बसण्यास ईच्छूक असतील, त्यांनी त्यांचे अर्ज विहीत प्रपत्रात योग्य त्या माध्यमाव्दारे **दिनांक २९/१०/२०२१ पर्यंत आपल्या कार्यालयात सादर करावेत.** तसेच संदर्भिय परिपत्रकाच्या अनुषंगाने ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी यापुर्वी परिक्षेकरीता अर्ज विहीत माध्यमाव्दारे सादर केलेले आहेत, त्यांनी परत अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

संबंधित अधिकारी/कर्मचारी हे दोन वेळेस परीक्षेस हजर राहण्याकरीता प्रवास भत्ता/दैनिक भत्ता मिळण्याकरीता पात्र राहतील. सदर परीक्षेचे ठिकाण आणि वेळापत्रक स्वतंत्ररीत्या अल्पकालावधीत कळविण्यात येईल.

तसेच सर्व कार्यालय प्रमुखांना याद्वारे सूचित करण्यात येते की, आपल्या अधिनिस्त असलेल्या व सदरील परिक्षेस बसण्यास इच्छुक असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांना सदर परिपत्रक निदर्शनास आणून दयावे. व अशा अधिकारी/कर्मचारी यांचे विहित प्रपत्रातील अर्ज एकत्रित करुन योग्य माध्यमाद्वारे **दिनांक ०८/११/२०२१ पर्यंत या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.** तद्नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने,**

21/10/21

**(धिरजकुमार रा. कदम)**
**कुलसचिव**

**प्रतिलिपीः** संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/ संचालक संशोधन/ संचालक विस्तार शिक्षण/ सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण)/ विद्यापीठ अभियंता/ नियंत्रक, वनामकृवि, परभणी *यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक आपल्या अधिनिस्त कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.*

**प्रत :**

१. मा. कुलगुरु महोदय यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.

२. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, परभणी *यांना देवून कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक **३६ वी विद्यापीठ कर्मचारी सेवाप्रवेशोत्तर परीक्षेकरीता अर्ज करण्यास वाढीम मुदत** या सदराखाली विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.*